# बी.ए. भाग I (सेमिस्टर- I, CBCS)
# भूगोल पेपर क्रमांक: I
# प्राकृतिक भूगोल (Physical Geography)
# Sub. Code: 71240
# Question Bank

---

## Unit-I

**खालील प्रश्नासाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा**

1. प्राकृतिक घटकांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला काय म्हणतात?

अ)मानवी भूगोल ब)प्राकृतिक भूगोल

क)लोकसंख्या भूगोल ड)वाहतूक भूगोल

2. कोणत्या घटकांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे प्राकृतिक भूगोल होय?

अ) रासायनिक ब) जैविक

क) अजैविक ड) भौतिक

3. नैसर्गिक शास्त्राचा एकत्रित अभ्यास कोणत्या शाखेत केला जातो?

अ) प्राकृतिक भूगोल ब) मानवी भूगोल

क) राजकीय भूगोल ड) वसाहती भूगोल

4. पृथ्वीवरील भूमीस्वरूपे त्यांची निर्मिती, उत्क्रांती, वर्गीकरण यांचा अभ्यास कोणत्या शाखेत केला जातो?

अ) मानवी भूगोल ब) भूरूपशास्त्र

क) प्राणीशास्त्र ड) हवामान शास्त्र

5. पृथ्वीच्या पृष्ठभागावर किती टक्के पाणी आढळते?

अ)70 % ब) 71 %

क) 72 % ड)69 %

6. खालील पैकी कोणती प्राकृतिक भूगोलाची शाखा नाही?

अ)भूरूपशास्त्र ब)हवामानशास्त्र

क)सागरशास्त्र ड)राजकीय भूगोल



प्रा.डॉ. एन.के.बनसोडे, भूगोल विभाग, भोगावती महाविद्यालय,कुरुकली

7. खालीलपैकी कोणती प्राकृतिक भूगोलाची शाखा आहे?

अ)आर्थिक भूगोल ब)राजकीय भूगोल

क)सागरी भूगोल ड)पर्यटन भूगोल

8. भूरूपशास्त्र ही कोणत्या भूगोलाची उपशाखा आहे?

अ)प्राकृतिक भूगोल ब)मानवी भूगोल

क)लोकसंख्या भूगोल ड)यापैकी नाही

9. कोणत्या शाखेत पृथ्वीवरील भूरूपांचा अभ्यास केला जातो?

अ)भूरूपशास्त्र ब)हवामानशास्त्र

क)जीवशास्त्र ड)सागरशास्त्र

10. कोणत्या शाखेत विश्व, सूर्यमाला, ग्रह, उपग्रह यांचा अभ्यास केला जातो?

अ)खगोलशास्त्र ब)भूरूपशास्त्र

क)हवामानशास्त्र ड)मृदाशास्त्र

11. पृथ्वीवरील सागराचा अभ्यास कोणत्या शाखेत केला जातो?

अ) मृदाशास्त्र ब) सागरशास्त्र

क) खगोलशास्त्र ड) खनिजशास्त्र

12. पृथ्वीवरील पाण्याने व्यापलेल्या भागास काय म्हणतात?

अ) भूकवच ब) वातावरण

क) जीवावरण ड) जलावरण

13. पर्वत, पठार,मैदाने हे कोणत्या श्रेणीचे भूरूपे आहेत ?

अ) प्रथम ब) द्वितीय

क) तृतीय ड) यापैकी नाही

14. पृथ्वीच्या सभोवताली असलेल्या हवेच्या आवरणाला काय म्हणतात?

अ) जीवावरण ब) शिलावरण

क) वातावरण ड) जलावरण

15. जागतिक हवामान शास्त्र दिन केव्हा साजरा केला जातो?

अ) 23 मार्च ब) 21 मार्च

क) 22 मार्च ड) 20 मार्च

# Unit-2

1. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून केंद्र भागापर्यंत चे अंतर किती किलोमीटर आहे?

अ)6370 ब)6372

क)6371 ड)7371

2. भूकवचाच्या बाह्य भागास काय म्हणतात?

अ)भूकवच किंवा शिलावरण ब)प्रावरण

क)गाभा ड) यापैकी नाही

3. पृथ्वीच्या एकूण क्षेत्रफळापैकी शिलावरणाने किती टक्के भाग व्यापलेला आहे?

अ) 3 ब) 4

क) 2 ड) 5

4. पृथ्वीच्या एकूण क्षेत्रफळापैकी प्रावरणाने किती टक्के भाग व्यापलेला आहे?

अ) 82 ब) 85

क) 90 ड) 92

5. सियाल (SIAL) तर कशापासून बनलेला आहे?

अ) सिलिका व अल्युमिनियम ब) सिलिका व मॅग्नेशियम

क) सिलिका व लोहखनिज ड) वरील सर्व

6. सायमा (SIMA)) तर कशापासून बनलेला आहे?

अ) सिलिका व अल्युमिनियम ब) सिलिका व मॅग्नेशियम

क) सिलिका व लोहखनिज ड) वरील सर्व

7. कोणत्या थरास निफे या नावाने ओळखतात?

अ) भूकवच ब) प्रावरण

क) गाभा ड) वरील सर्व

8. भूखंड वहन सिद्धांत कोणी मांडला?

अ)वेगनर ब)कार्ल रिटर

क)डेविस ड)हूम्बोल्ट

9. भूखंड वहन सिद्धांत किती साली मांडला?

अ)1913 ब)1912

क)1914 ड1920

10. वीस कोटी वर्षांपूर्वी एकच मोठा सलग अशा भूमी खंड पृथ्वीवर अस्तित्वात होता त्यास काय म्हणतात?

अ) पॅन्थालसा ब) टेथीस

क) पॅसिफिक ड) पँजिया (Pangaea)

11. पँजिया (Pangaea) कोणत्या महासागराने वेढलेला होता?

अ) पॅन्थालसा ब) टेथीस

क) पॅसिफिक ड)हिंदी

12. पँजिया चे विभाजन झाल्यानंतर कोणता समुद्र तयार झाला?

अ)पॅसिफिक समुद्र ब)अटलांटिक समुद्र

क)अरबी समुद्र ड)टेथीस समुद्र

13. पृथ्वीच्या अंतर्गत भागात ज्या ठिकाणी भूकंप निर्माण होतो त्या ठिकाणास काय म्हणतात?

अ)भूकंपाचे केंद्र ब) भूकंपाचे बाह्यकेंद्र

क)गाभा ड)वरील सर्व

14. भूकंपाच्या तीव्रतेचे मापन कोणत्या परिमाणात केले जाते?

अ)सिस्मोग्राफ ब) रिश्टर स्केल

क)वायुदाबमापक ड) तापमापक

15. नकाशावर समान वेळेला भूकंप झालेल्या ठिकाणे एका रेषेत जोडले जातात त्यास काय म्हणतात?

अ) समताप रेषा ब) वायुदाब रेषा

क) समकंप रेषा ड) सहकंप रेषा

16. नकाशावर भूकंपाच्या समान तीव्रतेची ठिकाणे एका रेषेत जोडले जातात त्यास काय म्हणतात?

अ) समताप रेषा ब) सहकंप रेषा

क) समकंप रेषा ड) वायुदाब रेषा

17. भूकंप लहरीचे मापन कोणत्या उपकरणात केले जाते?

अ)सिस्मोग्राफ ब)तापमापक

क)वायुदाबमापक ड) वरील सर्व

18. कोणत्या भुकंपलहरी सर्वात विध्वंसक असतात?

अ)भूपृष्ठीय ब)प्राथमिक

क)दुय्यम ड)यापैकी नाही

19. सुनामी हे खालीलपैकी कशाचा परिणाम आहे?
अ)भूकंप ब)महापूर
क)दुष्काळ ड)वरील सर्व

20. कोणत्या देशास भूकंपाचा देश म्हणून ओळखला जाते?
अ)भारत ब)जपान
क)चीन ड)इराण

21. ज्या ज्वालामुखीतून सतत उद्रेक होत असतात त्यास काय म्हणतात ?
अ) जागृत ज्वालामुखी ब) निद्रिस्त ज्वालामुखी
क) मृत ज्वालामुखी ड) वरील सर्व

22. ज्या ज्वालामुखीतून उद्रेक व्हायचे थांबले आहेत परंतु अचानक उद्रेक होण्याची शक्यता आहे अशा ज्वालामुखीस काय म्हणतात?
अ) जागृत ज्वालामुखी ब) निद्रिस्त ज्वालामुखी
क) मृत ज्वालामुखी ड) वरील सर्व

23. ज्या ज्वालामुखीतून उद्रेक होण्याचे थांबले आहे आणि भविष्यात उद्रेक होण्याची शक्यता नाही अशा ज्वालामुखीला काय म्हणतात?
अ) जागृत ज्वालामुखी ब) निद्रिस्त ज्वालामुखी
क) मृत ज्वालामुखी ड) वरील सर्व

24. जगातील सर्वात जास्त ज्वालामुखी कोणत्या पट्ट्यात आढळतात?
अ)पॅसिफिक पट्टा ब)युरेशियन पट्टा
क)अटलांटिक पट्टा ड) अरेबियन पट्टा

# Unit - 3

1. भौतिक क्रियेचा मूळ खडकावर परिणाम होऊन त्या खडकावर ताण पडतो व खडकाचे तुकडे होतात त्यास काय म्हणतात?
अ) भौतिक विदारण ब) रासायनिक विदारण
क) जैविक विदारण ड) वरील सर्व

2. खडकांच्या पृष्ठभागापासून खडकांचे पापुद्रे अलग होतात या विदारणाला काय म्हणतात?
अ) अपदलन ब) रासायनिक विदारण
क) जैविक विदारण ड) वरील सर्व

3. वनस्पती, प्राणी व मानव यांच्यामुळे विघटन क्रिया होऊन खडक कमकुवत होतात या विदारणाला काय म्हणतात या?

अ) भौतिक विदारण ब) रासायनिक विदारण

क) जैविक विदारण ड) वरील सर्व

4. क्षरण चक्र संकल्पना कोणी मांडली?

अ)वेगनर ब)कार्ल रिटर

क) विल्यम मॉरिस डेव्हिस ड)हूम्बोल्ट

5. कोणत्या शास्त्रज्ञाच्या मते प्रत्येक भुरूप भूरचना, प्रक्रिया आणि कालावधी यांच्या परिणामातून निर्माण होते?

अ)वेगनर ब)कार्ल रिटर

क) विल्यम मॉरिस डेव्हिस ड)हूम्बोल्ट

6. नदीच्या तीन अवस्था कोणत्या शास्त्रज्ञांनी सांगितल्या?

अ)वेगनर ब)कार्ल रिटर

क) विल्यम मॉरिस डेव्हिस ड)हूम्बोल्ट

7. त्रिभुज प्रदेश हे भूरूप नदीच्या कोणत्या अवस्थेत तयार होते?

अ) युवावस्था ब) प्रौढावस्था

क) वृद्धावस्था ड) यापैकी नाही

8. खालीलपैकी कोणते भूरूप नदीच्या खनन कार्यामुळे निर्माण होते?

अ) धबधबा ब) पूरमैदाने

क) त्रिभूज प्रदेश ड) पूरतट

9. खालीलपैकी कोणते भूरूप नदीच्या संचयन कार्यामुळे निर्माण होते?

अ) व्ही आकाराची दरी ब) धबधबा

क) त्रिभूज प्रदेश ड) यू आकाराची दरी

# Unit-4

## खालील प्रश्नासाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा

1. पृथ्वीभोवती असलेल्या हवेच्या आवरणाला काय म्हणतात?

अ)शिलावरण ब)वातावरण

क)जीवावरण ड)जलावरण

2. अल्प कालावधीसाठी असणाऱ्या वातावरणाच्या स्थितीला काय म्हणतात?

अ) हवा ब) हवामान

क) वातावरण ड)जलावरण

3. दीर्घ कालावधीसाठी असणाऱ्या वातावरणाच्या स्थितीला काय म्हणतात?

अ) हवा ब) हवामान

क) वातावरण ड) शिलावरण

4. वातावरणात नायट्रोजन वायूचे प्रमाण किती टक्के आहे?

अ)78 % ब)92 %

क)99 % ड)80 %

5. कोणता वायू निष्क्रिय आहे?

अ) ऑक्सिजन ब) नायट्रोजन

क) हायड्रोजन ड) ओझोन

6. वातावरणातील ऑक्सिजन ची तीव्रता कमी करण्यासाठी कोणता वायू उपयोगात येतो?

अ) ऑक्सिजन ब) नायट्रोजन

क) हायड्रोजन ड) कार्बन डाय-ऑक्साइड

7. ओझोन हा वायू कोणत्या थरात आढळतो?

अ) तपांबर ब) स्थितांबर

क) बाहयांबर ड) आयनांबर

8. ओझोन वायूच्या थरात कोणत्या किरणांचे शोषण होते?

अ)अतिनील किरणे ब)लेसर

क)क्षकिरण ड)यापैकी नाही

9. वातावरणाचा सर्वात खालचा थर कोणता?

अ)तपांबर ब)स्थितांबर

क)दलांबर ड)आयनांबर

10. पृथ्वीवरील सजीव सृष्टी कोणत्या थरात आढळते?

अ)तपांबर ब)स्थितांबर

क)दलांबर ड)आयनांबर

11. धुलीकरणामुळे आकाशाला कोणता रंग प्राप्त होतो?

अ)हिरवा ब)पिवळा

क)निळा ड)लाल

12. पृथ्वीवर एकूण किती वायु दाबपट्टे आहेत?

अ) 7 ब) 4

क)3 ड) 2

13. समुद्रसपाटीला हवेचा भार किती असतो?

अ) 1013 मिलीबार ब) 1010 मिलीबार

क) 1012 मिलीबार ड) 1011 मिलीबार

14. जसजसे उंच जावे तसतसे तापमान कमी होण्याच्या ऐवजी वाढते त्यास काय म्हणतात?

अ) तापमानाची विपरीतता ब) तापमानाचा ऱ्हास दर

क) समताप रेषा ड) यापैकी नाही

15. कोणत्या अक्षवृत्तावर वर्षभर सूर्यकिरणे लंबरुप पडतात?

अ)विषुववृत्त ब)मकरवृत्त

क)कर्कवृत्त ड)वरील सर्व

16. नकाशावर समान तापमानाची ठिकाणी जोडणाऱ्या रेषेच्या काय म्हणतात?

अ) समताप रेषा ब) समदाब रेषा

क) संहकंप रेषा ड)वरील सर्व

17. सूर्यापासून बाहेर फेकलेली सौरशक्ती पृथ्वीपर्यंत येण्यास किती कालावधी लागतो?

अ) 8 मिनिट ब) 7 मिनिट

क) 6 मिनिट ड) 5 मिनिट

18. सूर्याच्या पृष्ठभागापासून बाहेर पडणाऱ्या उष्णतेला काय म्हणतात?

अ) वातावरण ब) सौरशक्ती

क) जिवावरण ड) जलावरण

19. कोणत्या दिवशी सूर्यकिरणे विषुववृत्तावर ती लंबरूप पडतात?

अ) 21 मार्च व 22 सप्टेंबर ब) 20 मार्च व 23 सप्टेंबर

क) 23 मार्च व 24 सप्टेंबर ड) 19 मार्च व 20 सप्टेंबर

20. तापमान मोजण्यासाठी कोणते उपकरण वापरतात?

अ) वायुदाब मापक ब) प्रजन्य मापक

क) तापमापक ड) वरील सर्व

21. कोणत्या अक्षवृत्तावर वर्षभर सूर्यकिरणे लंबरुप प्रकाशतात?

अ) मकरवृत्त ब) कर्कवृत्त

क) विषुववृत्त ड) ध्रुवीय प्रदेश

22. 21 जून रोजी कोणत्या अक्षवृत्तावर सूर्यकिरणे लंबरुप पडतात?

अ) मकरवृत्त ब) कर्कवृत्त

क) विषुववृत्त ड) ध्रुवीय प्रदेश

23. 21 डिसेंबर रोजी कोणत्या अक्षवृत्तावर सूर्यकिरणे लंबरुप पडतात?

अ) मकरवृत्त ब) कर्कवृत्त

क) विषुववृत्त ड) ध्रुवीय प्रदेश

24. सर्वाधिक तापमान कोणत्या कटिबंधात असते?

अ) उष्ण कटिबंध ब) शीत कटिबंध

क) समशीतोष्ण कटिबंध ड) वरील सर्व

25. कोणते वारे विषुववृत्तीय प्रदेशाकडे नियमित वाहतात?

अ)व्यापारी वारे ब)प्रतिव्यापारी वारे

क) खारे वारे ड)वरील सर्व

26. वाऱ्याची दिशा व वेग कशावर अवलंबून असतो?

अ) तापमान ब) वायुदाब

क) सूर्यकिरणे ड) वरील सर्व

27. पृथ्वीच्या पृष्ठभागावरून नियमित वाहणारे वारे कोणत्या नावाने ओळखले जाते जातात?

अ) व्यापारी वारे ब) ग्रहीय वारे

क) प्रति व्यापारी वारे ड) ध्रुवीय वारे

28. विषुववृत्तीय प्रदेशाकडे नियमित वाहणारे वारे कोणत्या नावाने ओळखतात?

अ) व्यापारी वारे ब) ग्रहीय वारे

क) प्रति व्यापारी वारे ड) ध्रुवीय वारे

29. कोणत्या वाऱ्यांना पश्चिमी वारे या नावाने ओळखतात?

अ) व्यापारी वारे ब) ग्रहीय वारे

क) प्रति व्यापारी वारे ड) ध्रुवीय वारे

30. 40 अंश दक्षिण अक्षवृत्त पलीकडे प्रति व्यापारी वारे वेगाने व आवाज करीत वाहतात त्यास काय म्हणतात?

अ) गरजणारे चाळीस ब) खवळलेले पन्नास

क) किंचाळणारे साठ ड) वरील सर्व

31. 60 अंश दक्षिण अक्षवृत्त पलीकडे प्रति व्यापारी वारे प्रचंड वेगाने आवाज करीत वाहतात त्यास काय म्हणतात?

अ) गरजणारे चाळीस ब) खवळलेले पन्नास

क) किंचाळणारे साठ ड) वरील सर्व

# प्राकृतिक भूगोल (Physical Geography)

## Sub. Code: 71240

## Answer Key

## Unit-I

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ब)प्राकृतिक भूगोल | 9 | अ)भूरूपशास्त्र |
| 2 | ड) भौतिक | 10 | अ)खगोलशास्त्र |
| 3 | प्राकृतिक भूगोल | 11 | ब) सागरशास्त्र |
| 4 | ब) भूरूपशास्त्र | 12 | ड) जलावरण |
| 5 | ब) 71 % | 13 | ब) द्वितीय |
| 6 | ड)राजकीय भूगोल | 14 | क) वातावरण |
| 7 | क)सागरी भूगोल | 15 | अ) 23 मार्च |
| 8 | अ)प्राकृतिक भूगोल | | |

## Unit-II

| | | | |
|---|---|---|---|
| **1** | क)6371 | **13** | अ)भूकंपाचे केंद्र |
| **2** | अ)भूकवच किंवा शिलावरण | **14** | ब) रिश्टर स्केल |
| **3** | क) 2 | **15** | ड) सहकंप रेषा |
| **4** | अ) 82 | **16** | क) समकंप रेषा |
| **5** | अ) सिलिका व अल्युमिनियम | **17** | अ)सिस्मोग्राफ |
| **6** | ब) सिलिका व मॅग्नेशियम | **18** | अ)भूपृष्ठीय |
| **7** | क) गाभा | **19** | अ)भूकंप |
| **8** | अ)वेगनर | **20** | ब)जपान |
| **9** | ब)1912 | **21** | अ) जागृत ज्वालामुखी |
| **10** | ड) पँजिया (Pangaea) | **22** | ब) निद्रिस्त ज्वालामुखी |
| **11** | अ) पॅन्थालसा | **23** | क) मृत ज्वालामुखी |
| **12** | ड)टेथीस समुद्र | **24** | अ)पॅसिफिक पट्टा |

# Unit-III

| | |
|---|---|
| 1 | अ) भौतिक विदारण |
| 2 | अ) अपदलन |
| 3 | क) जैविक विदारण |
| 4 | क) विल्यम मॉरिस डेव्हिस |
| 5 | क) विल्यम मॉरिस डेव्हिस |
| 6 | क) विल्यम मॉरिस डेव्हिस |
| 7 | क) वृद्धावस्था |
| 8 | अ) धबधबा |
| 9 | क) त्रिभूज प्रदेश |

# Unit-IV

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ब)वातावरण | 17 | अ) 8 मिनिट |
| 2 | अ) हवा | 18 | ब) सौरशक्ती |
| 3 | ब) हवामान | 19 | अ) 21 मार्च व 22 सप्टेंबर |
| 4 | अ)78 % | 20 | क) तापमापक |
| 5 | ब) नायट्रोजन | 21 | क) विषुववृत्त |
| 6 | ब) नायट्रोजन | 22 | ब) कर्कवृत्त |
| 7 | ब) स्थितांबर | 23 | अ) मकरवृत्त |
| 8 | अ)अतिनील किरणे | 24 | अ) उष्ण कटिबंध |
| 9 | अ)तपांबर | 25 | अ)व्यापारी वारे |
| 10 | अ)तपांबर | 26 | ब) वायुदाब |
| 11 | क)निळा | 27 | ब) ग्रहीय वारे |
| 12 | अ) 7 | 28 | अ) व्यापारी वारे |
| 13 | अ) 1013 मिलीबार | 29 | क) प्रति व्यापारी वारे |
| 14 | अ) तापमानाची विपरीतता | 30 | अ) गरजणारे चाळीस |
| 15 | अ)विषुववृत्त | 31 | क) किंचाळणारे साठ |
| 16 | अ) समताप रेषा | | |